# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०५/२०१५ |
| | मा. स्थायी समिती सभा सु.क्र.०२ दि. २५/[illegible]/२०१५ |
| | मूळप्रत |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : प्रकरण क्रं. १० ते १८ पर्यंत.

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

②

१५/१६

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०२/०५/२०१५.

## <u>मा. स्थायी समिति सभा</u>

**सभा सूचना क्र. :- ०२ दिनांक ०२/०५/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०८/०५/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. ०२/०५/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०२, दि. ०२/०५/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शुक्रवार दि. ०८/०५/२०१५**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १० | दि. ०४/०३/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरारोड येथे डी.एस.आर.सी. क्लिनिकसाठी संगणक खरेदीसाठी कार्योत्तर मंजूरीबाबत. |
| १२ | भाईंदर (पूर्व) गोडदेव आरक्षण क्र. २५९ व काशी, जरी मरी तलाव जवळील जागा महानगर गॅस लि. यांना भाड्याने देणेबाबत. |
| १३ | मिरा भाईंदर महानगरपालिकेस नव्याने प्राप्त होणाऱ्या बसेस पार्कींगसाठी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करणे कामाबाबत. |
| १४ | निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (शिक्षण विभाग). |
| १५ | निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १६ | **मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत.**<br>*मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात सी.सी. टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे.* |
| १७ | **मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत.**<br>मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभांगाकरीता टोनर कारटीज पुरवठा करणे व प्रिंटरर्स व प्रिंटर्सची देखभाल दुरुस्ती विनामुल्य करणे. |
| १८ | **मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणेबाबत.**<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणक संच देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- ०२/०५/२०१५.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ०४/०३/२०१५

# रोजीचे इतिवृत्तांत

१

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०३/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०४/०३/२०१५ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. २४/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी १०.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रशांत एन. केळूसकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सभापती |
| २. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ३. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ५. | श्री. हरिश्चंद्र आमगावकर | सदस्य |
| ६. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ७. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| १०. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ११. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| १३. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १४. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १५. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सुप्रभात. सर्व सन्मा. सदस्यांना होळीच्या आगाऊ शुभेच्छा. आपल्याकडे नविनच रुजू झालेले मा. आयुक्त साहेब ह्यांना देखील शुभेच्छा. प्रत्येक सदस्यांनी आपआपली ओळख मा. आयुक्तांना द्यावी. मा. आयुक्तांचा देखील आपण परिचय घेऊया. सर्व सन्मा. सदस्यांना आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडू. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ०४/०३/२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. २४/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १६०, दि. ०९/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. ०९/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १६० :-**

दि. ०९/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५४ :-**

दि. ०९/०१/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर** **अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

ठराव सर्वानुमते मंजूर

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६१, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे, प्रकरण क्र. १६२, शिक्षण विभागाचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे, प्रकरण क्र. १६३, परिवहन सेवेचे सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे, प्रकरण क्र. १६४, सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. *मा. आयुक्त चारही बजेट मा. सभापतींना सादर करतील.*

**मा. आयुक्त :-**

१. मा. स्थायी समिती सभापती श्री. प्रशांत केळुसकर, सन्मा. स्थायी समिती सदस्य, उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज आपणासमोर सादर करीत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सेवा/सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रशासनाचा मानस आहे. उपलब्ध साधन-सामुग्रीचा सुनियोजीत वापर करुन आर्थिक व भौतिक उद्दीष्ट गाठण्याचा प्रयत्न प्रशासन करीत आहे. हा अर्थसंकल्प वस्तुनिष्ठ, पायाभुत सोयी-सुविधा व प्रगतीपथावरील असलेल्या प्रकल्पांना प्राधान्य देणारा आहे. नागरिकांकडून कर व दर रुपाने प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग शहरवासीयांच्या मुलभूत-पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी केला जात आहे, तथापि सर्वच मुलभूत-पायाभूत गरजा महानगरपालिका निधीतून करणे शक्य नसल्याने त्यास पूरक निधी म्हणून शासकीय अनुदान व कर्ज यावर काही प्रमाणात विसंबून रहावे लागते. मागील सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पुरविण्यात आलेल्या मुलभूत सेवांचा अहवाल पाहता कर व दर वाढ करणे क्रमप्राप्त असल्याचे निदर्शनास येईल. असे असताना देखील या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारची कर व दर वाढ करण्यात आलेली नाही.

२. **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान**

**अ. पर्जन्य जलवाहिन्या टप्पा क्र.२**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प टप्पा क्र. ०२ अंतर्गत मिरा-भाईंदर शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरिता पर्जन्य जलवाहिन्या बांधण्याचा रक्कम रु. १०४.६० **कोटीचा** प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ७० % रक्कम शासन

अनुदान व ३० % रक्कम महानगरपालिकेच्या स्वनिधीतून खर्च करावी लागणार आहे. स्वनिधीतून खर्च करावयाची रक्कम कर्ज रुपाने उपलब्ध करून घेण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. ३१.३८ **कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**ब. विकास योजने अंतर्गत रस्ते बांधकाम**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत मिरा-भाईंदर शहरातील विकास योजनेतील रस्ते बांधण्याचा रक्कम रु. ९७.१७ **कोटीचा** प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ७० % रक्कम शासन अनुदान व ३० % रक्कम महानगरपालिकेच्या स्वनिधीतून खर्च करावी लागणार आहे. स्वनिधीतून खर्च करावयाची रक्कम कर्ज रुपाने उपलब्ध करून घेण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. २९.१५ **कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

३. **नविन पाणी योजना**

महानगरपालिकेस आजमितीस स्टेम प्राधिकरणाकडून ८६ द.लि.लि. व एम.आय.डी.सी. कडून ५० द.लि.लि. असा एकूण १३६ द.लि.लि. पाणी-पुरवठा होत आहे. शहराची गरज सुमारे १७२ द.लि.लि. आहे. पाणी-पुरवठयातील तुट भरुन काढण्यासाठी एम.आय.डी.सी. कडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. याची फलश्रुती म्हणून एम.आय.डी.सी ने महानगरपालिकेस अतिरिक्त ७५ द.लि.लि. पाणी-पुरवठा करण्यास मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. २६१.६२ **कोटी** आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्र सुर्वणजयंती नगरोत्थान अभियाना अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे. शासन मान्यतेनंतर सदर प्रकल्प हाती घेण्यात येईल. यासाठी महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून अर्थसंकल्पात रु. २० **कोटी** तरतुद प्रस्तावित केली आहे.

**३. वृक्ष प्राधिकरण**

**अ. उत्तन येथे जैव विविधता उद्यान (Bio-diversity Park) तयार करणे.**

उत्तन येथील स.क्र.३५२ (क्षेत्र ९९ हेक्टर) येथील जमिन महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असून पर्यटनासाठी (Tourism) आरक्षित आहे. सदर ठिकाणी ३१ हेक्टर क्षेत्रावर जैव विविधता उद्यान (Bio-diversity Park) तयार करण्याचे काम सन २०१५-१६ मध्ये प्रस्तावित आहे. या उद्यानामुळे मोठ्या प्रमाणात जैव विविधतेच्या संवर्धनाबरोबरच (उदा. प्राणी, पक्षी, किटक, कांदळवन, विविध वनस्पती यांची एकात्मिक जोपासना) लोकांच्या ज्ञानामध्ये भर पडणार आहे. याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे (MTDC) सादर करण्यात आला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सदर उद्यान विकासाचे काम हाती घेण्यात येईल. यासाठी अर्थसंकल्पात **रु. ५० लक्ष** तरतुद प्रस्तावित केली आहे

**ब. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात १० थीम पार्क विकसित करणे.**

शहरातील आरक्षण क्र.२१६, २३०, २३५, २४२, २६९, ३२९, २५५, १००, ३६८ व ३७० या १० आरक्षणाचे ठिकाणी थिम पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर थीम पार्कच्या डिझाईन मध्ये प्राचीन वास्तुशास्त्रातील पंचतत्त्वावर (पृथ्वी, पाणी, वायू, सुर्य आणि आकाश) आधारित तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक, संगीत, शास्त्रीय इत्यादींचा समावेश करणेत आला आहे. नागरिकांसाठी माहिती केंद्र, शैक्षणिक फिल्मस् दाखविण्यासाठी व छोट्या कार्यक्रमासाठी एक ॲम्पी थिएटर, स्वच्छता गृहे, गांडुळ खत प्रकल्प ,सौरदिवे वापर, विविध खेळण्याची साधने, जॉगिंग ट्रॅक, सायकलिंग ट्रॅक, फुड स्टॉल, कॅफे इत्यांदीचा देखील समावेश यामध्ये असणार आहे. याद्वारे शहरातील नागरिक विशेषतः शालेय विद्यार्थ्यांसाठी एक असामान्य सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात **रु. १५ कोटी** निधी प्रस्तावित केला आहे.

**क. घोडबंदर किल्ला सुशोभिकरण करणे**

महानगरपालिका क्षेत्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ घोडबंदर किल्ल्याचे सुशोभिकरणाचे काम सन २०१५-१६ मध्ये प्रस्तावित केले आहे. यासाठी वास्तूविशारदाची नेमणूक केली असून संकल्प चित्रास भारतीय पुरातत्व विभागाची मान्यता मिळाल्यानंतर सदर काम हाती घेण्यात येईल. या कामासाठी जिल्हा नियोजन समिती कडून सुमारे **रु. १ कोटी** निधी अपेक्षित आहे व उर्वरित रक्कम आवश्यकतेनुसार महानगरपालिकेच्या स्वनिधीतून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. **१ कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**४. शालेय क्रिडा स्पर्धा**

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नियमितच्या अभ्यासाबरोबर त्यांच्यातील इतर कलागुणांना वाव मिळावा यासाठी वकृत्व, चित्रकला, निबंध, पथनाटय इत्यादी स्पर्धांबरोबरच विद्यार्थ्यांची शारिरीक जडणघडण होण्यासाठी शालेय क्रिडा-स्पर्धा आयोजित करणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबरच शारिरीक विकास साधला जाईल. यासाठी अर्थसंकल्पात **रु. १५ लक्ष** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**५. अभ्यासिका सुरु करणे**

महानगरपालिका क्षेत्रात सध्या ४ ठिकाणी अभ्यासिका सुरु आहेत. या योजनेला मिळालेला चांगला प्रतिसाद पाहता ३ नविन अभ्यासिका सुरु करणे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात **रु. ३० लक्ष** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे

**६. भाईंदर रेल्वे स्थानक सब-वे**

भाईंदर पुर्व व पश्चिम यांना जोडणारा अत्यंत महत्वाचा दुवा असणाऱ्या **"भाईंदर रेल्वे स्थानक सब-वे प्रकल्पाचे"** काम अंतिम टप्प्यात असून सब-वे च्या दोन्ही बाजुच्या पोहच रस्त्यांचे काम सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्यात येणार आहे. सब-वे प्रकल्पाचे काम पुर्ण झाल्यानंतर शहराच्या भाईंदर भागातील नागरिकांच्या प्रवासाच्या अंतरात व वेळेत मोठी बचत होणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात **रु. २० कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**७. अग्निशमन केंद्र**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ७९ चौ.कि.मी. आहे. शासन धोरणानुसार प्रति १० चौ.कि.मी ला एक अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. शहरात सध्या ६ अग्निशमन केंद्रे अस्तित्वात आहेत व आणखी २ अग्निशमन केंद्राची आवश्यकता आहे. आगसुरक्षा व प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता शहरात २ नवीन अग्निशमन केंद्रे सन २०१५-१६ मध्ये उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी अग्निशमन वाहने अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करणे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात रक्कम **रु. १४.०० कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**८. रुग्णालय बांधकाम**

मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याचे अनुषंगाने महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमध्ये पं.भिमसेन जोशी (टेंभा) रुग्णालयाचा समावेश होतो. सदर रुग्णालय २०० खाटांचे असून त्याचा विकास टप्याटप्याने करणे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्यात ५० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यात येईल. रुग्णालयाचे उर्वरित

बांधकाम व रुग्णालयाकरिता लागणारे फर्निचर, यंत्रसामग्री व पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा करिता अर्थसंकल्पात रु. ११ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**९. नविन शाळा इमारत बांधकाम**

मिरा-भाईंदर शहरातील महानगरपालिका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सुविधांमध्ये वाढ करण्याकरिता सुसज्ज शाळा इमारती बांधणे आवश्यक आहे. यामध्ये सन १९९४ मध्ये जिल्हा परिषदेकडून तत्कालिन नगरपरिषदेकडे हस्तांतरित झालेल्या शाळांची पुर्नबांधणी करण्याचे प्रस्तावित आहे. मोडकळीस आलेल्या मोर्वा, चौक व काजुपाडा येथील शाळांच्या कौलारु इमारतींच्या जागी तळ अधिक चार मजल्याच्या शाळा इमारतींचे बांधकाम करण्यात येणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१०. श्री छत्रपती शिवाजी महाराज रस्ता रुंदीकरण व सुशोभिकरण**

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा शहरात येण्यासाठी प्रमुख मार्ग आहे. या रस्त्यावर वाहतूकीची नेहमीच वर्दळ असते. शहरातील या प्रमुख रस्त्यासाठी तांत्रिक सल्लागार नमून दर्जा उन्नती व सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. यामध्ये ४५ मीटर रुंदीच्या रस्त्यास समांतर सर्विस रस्ते तयार करणे, नाल्याचा भाग खाली घेवून त्याचा रस्ता म्हणून वापर करणे/रस्ता रुंदीकरण करणे अशा इत्यादी बाबींसाठी अर्थसंकल्पात रु. ७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**११. श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, सुशोभिकरण**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रवेशद्धारावरील श्री छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयाच्या सभोवतालचा रस्ता उंच झाल्याने व राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलामुळे पुतळयाच्या सौंदर्यात अडथळा निर्माण झाला असल्याने याकरिता तांत्रिक सल्लागार नेमणूक करुन पुतळा रस्त्याच्या मध्यभागी स्थलांतरीत करणे, पुतळयाच्या चबुतऱ्याची उंची वाढविणे, व सभोवतालच्या उद्यानाचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. १ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१२. मालमत्तांचे फेर मुल्यांकन**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मालमत्तांचे सन १९९७ पासून फेर मुल्यांकन करण्यात आलेले नाही. अद्यापपर्यंत तत्कालिन नगरपरिषदेचेच दर लागू असून शहरातील नव्याने विकसित झालेल्या इमारतींचे व विकसित होत असलेल्या इमारतींच्या कराचे फेर मुल्यांकन करणे अत्यंत गरजेचे आहे. याद्वारे महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नात
कायमस्वरुपी भरीव वाढ होणार आहे. परिणामी मनपाची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल. यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रु. ८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१३. घनकचरा व्यवस्थापन**

शहरातील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन नियम २००० चे पालन करुन मौजे सकवार येथे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन वीज निर्मीती प्रकल्प (Waste to Energy) उभारण्याचे योजिले आहे. नविन घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करणे व दैनिक वार्ड साफसफाई करणे यासाठी अर्थसंकल्पात रु. ५९ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१४. मार्केट/कम्युनिटी हॉल बांधकाम**

शहरातील आरक्षण क्र.२१८ या जागेवर कम्युनिटी हॉल व आरक्षण क्र.२३१ या जागेवर मार्केट इमारत बांधकाम सुरु करण्यात आलेले असून सदरची कामे यावर्षी पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रु. ७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१५. महिला व बाल कल्याण योजना**

महानगरपालिका क्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण व बालकांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात विविध योजनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. ३ .८० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१६. महिलांसाठी विरंगुळा केंद्र सुरु करणे**

मिरा-भाईंदर शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान ज्यांनी दिलेले आहे, अशा शहरातील सर्व जेष्ठ नागरिकांना निवृत्तीत्तोर जीवनात विरंगुळा प्राप्त व्हावा व त्यांचे जीवन चैतन्यमय व आनंददायी राहावे याकरिता महानगरपालिकेने शहरात यापुर्वी चार विरंगुळा केंद्रे सुरु केली आहेत. सदर विरंगुळा केंद्रांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता सन २०१५-१६ मध्ये जेष्ठ महिला नागरिकांकरिता नवीन दोन विरंगुळा केंद्रे सुरु करण्याचा मानस आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. ५ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१७. सांडपाण्याचा पुर्नवापर**

मिरा-भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजनेअंतर्गत सांडपाण्याचा पुर्नवापर करणेकामी प्रायोगिक तत्वावर मल:निस्सारण केंद्रातून निघणाऱ्या सांडपाण्यावरील पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर प्रकल्प हाती घेण्याचे योजिले आहे. सदर पाणी बिगर घरगुती वापरासाठी, बगीचा, सार्वजनिक शौचालय व इमारत बांधकामासाठी वापरण्यात येईल. त्यामुळे पिण्याच्या पाणी-

पुरवठयात बचत होवून पाण्याचे दुर्भिक्ष काही प्रमाणात कमी होईल. यासाठी अर्थसंकल्पात **रु. २ कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१८. लघु नाट्यगृह**

मिरा-भाईंदर शहरास नाट्य संस्कृतीची परंपरा आहे. परंतु, शहरात एकही नाट्यगृह नसल्याने नाटयरसिकांची गैरसोय होत आहे. शहरातील नाट्य संस्कृती वृध्दिगंत करणे व नाट्यरसिकांना नाट्य परंपरेचा अधिकाधिक आस्वाद घेता यावा याकरिता आरक्षण क्र.२४१ मध्ये लघु नाट्यगृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात **रु. २ कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१९. नागरी सुविधा केंद्राचे बळकटीकरण**

संगणक आज्ञावलीद्वारे विविध प्रकारच्या संगणकीकृत सेवा नागरीकांना पुरविणे यामध्ये सर्व प्रकारचे अर्ज, दाखले, निवेदने, एस.एम.एस. सेवा, परवानग्या, प्रमाणपत्र **"पेमेंट गेट वे सुविधा"** तसेच अभिलेख्यांचे जतन करण्यासाठी Scanning व Digitization करणे याकरिता अर्थसंकल्पात रु. २.५० **कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२०. दुर्बल घटक**

महानगरपालिका क्षेत्रातील दुर्बल घटकांना रस्ते, वीज, आरोग्य विषयक सेवा-सुविधा तसेच पाणी-पुरवठा या मूलभूत सेवा पुरविण्यासाठी अर्थसंकल्पात **रु. १ कोटी** तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२१. अंध व अपंग कल्याण योजना**

महानगरपालिका क्षेत्रातील शारिरीक दृष्टया विकलांग असलेल्या नागरिकांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात रु. १ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२२. बांधकाम साहित्य तपासणी प्रयोगशाळा तयार करणे**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येत असलेल्या विकास कामांची गुणवत्ता तपासणे व कामांचा दर्जा उंचविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत बांधकाम साहित्य तपासणी प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. **१ कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२३. सार्वजनिक शौचालये**

सार्वजनिक शौचालया अभावी शहरातील प्रवासी, पादचारी यांची गैरसोय होवू नये म्हणून **मा. पंतप्रधान महोदयांचे "स्वच्छ भारत अभियानास"** अनुसरुन महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर दहिसर चेकनाका, काशिमिरा नाका, घोडबंदर, वर्सोवा तसेच सिल्व्हर पार्क, एस. के. स्टोन, शिवार उद्यान, पय्याडे जवळील रस्ता, मिरारोड रेल्वे स्टेशन, सृष्टी रोड अशा ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार **"बांधा-वापरा व हस्तांतरीत करा"** या तत्त्वावर सार्वजनिक शौचालये बांधण्याचे प्रस्तावित आहे. यामध्येच महानगरपालिका क्षेत्रात **"महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह"** बांधण्याचे कामही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**२४. सिग्नल यंत्रणा**

मिरा-भाईंदर शहरात प्रवेश करण्याकरिता श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा प्रमुख मार्ग आहे. या मार्गावर ७ विविध ठिकाणी सिग्नल कार्यान्वित आहेत.परंतु मार्गावरील वाहनांची वाढती संख्या पाहता वारंवार वाहतुकीची कोंडी होत आहे. सदर वाहतुकीची कोंडी सोडविण्याकरिता व प्रवास सुलभ होण्याकरिता सिग्नल यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. यासाठी अर्थसंकल्पात **रु. ८० लक्ष** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२५. मिरारोड रेल्वे स्टेशन सुशोभिकरण**

मिरारोड रेल्वे स्टेशनवरील प्रवाशांची मोठ्या प्रमाणावरील वर्दळ पाहता शहरातून बाहेर जाणारे व बाहेरुन शहरामध्ये येणारे प्रवासी यांचा होणारा धकाधकीचा रेल्वे प्रवास पाहता रेल्वे स्टेशनवर उतरल्यानंतर प्रवाशांना आल्हाददायक/सुखावह वाटावे म्हणून मिरारोड रेल्वे स्टेशन परिसर सुशोभिकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. यामध्ये पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे सदरचे काम यावर्षी पुर्णत्वास नेण्यासाठी या अर्थसंकल्पात रु. ७ **कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**२६. गॅस शवदाहिनी**

मिरा-रोड, पेणकर पाडा, बंदरवाडी व काशीमिरा येथील स्मशानभूमीत गॅस शवदाहिन्या बसविण्यासाठी अर्थसंकल्पात रु. २.०० **कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे

**२७. महानगरपालिकेचे ISO मानांकन करणे**

महानगरपालिकेच्या कामकाजात सुसुत्रता आणणे, तसेच नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचा दर्जा सुधारणेसाठी महानगपालिकेच्या विभागांचे प्राधान्यक्रमानुसार ISO मानांकन करणे प्रस्तावित आहे.

**२८. परिवहन सेवा**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठी केंद्र व राज्य शासनाकडील १०० टक्के अनुदानातून यावर्षी नविन अत्याधुनिक १०० बसेस परिवहन सेवेत दाखल होणार आहेत. यामुळे शहरवाशीयांचा बस प्रवास सुखकर होणार आहे. याशिवाय

Intellegent Transport System व बस डेपो, साधन सामग्रीसाठी जी.ई.एफ-५ या योजनेअंतर्गत जागतिक बँकेने अर्थसहाय्य करण्यासाठी आपल्या मिरा-भाईदर महानगरपालिकेची निवड केलेली असून, यासाठी जागतिक बँकेकडून सुमारे रु. १० कोटी अनुदान प्राप्त होणार आहे. घोडबंदर येथील आरक्षण क्र. २४८ मध्ये बस डेपो बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. याशिवाय परिवहन सेवेस अर्थसहाय्य म्हणून अर्थसंकल्पात रु. २३.०३ कोटी इतकी भरीव तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकातील उत्पन्नाच्या लेखाशिर्षानुसार अपेक्षित उत्पन्न रु. १३८४ कोटी ५९ लक्ष १९ हजार इतके आहे. त्यानुसार अपेक्षित खर्च रु. १३८४ कोटी ४७ लक्ष ३४ हजार वजा जाता शिल्लक रक्कम रु. ११ लक्ष ८५ हजार शिलकीचे अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात शहरवासीयांना जास्तीत जास्त नागरी सेवा-सुविधा पुरवून प्रशासन लोकाभिमुख करण्याचा मानस आहे. सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अर्थसंकल्पास मा. स्थायी समितीची मंजूरी मिळावी, ही विनंती. तर याच्यामध्ये आनंदाची एक गोष्ट सांगु इच्छितो की या संदर्भामध्ये काल मा. प्रधानस सचिव-२, सौ. मनिषाताई मणसेकर यांच्याकडे बैठक झाली आणि या सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रमाध्ये जो आपण प्रस्ताव २७० कोटीचा प्रस्तावित केला होता, तर त्याला डायरेक्टर ऑफीसने रिकमंडेशन केलं होते आणि त्यामुळे त्यांनी सर्व विभागाची काल बैठक लावली होती. आणि आपले प्रेझेन्टेशन त्याठिकाणी मिरा भाईदर महानगरपालिकेचे करण्यात आले होते. थोडक्यामध्ये आपण सर्व डिटेल काय परिस्थिती आहे मिरा भाईदर शहरामध्ये पाण्याची ही सगळी सांगितली आणि हे सगळे सांगितल्यानंतर मॅडमने मिरा भाईदर महानगरपालिकेची पाण्याची जी वसुली आहे त्याबद्दल ॲप्रिसिएशन केलेले आहे. त्यांनी स्ट्रॉंगली रिकमंडेशन केलेले आहे. मा. मुख्यमंत्री साहेबांकडे हा प्रस्ताव आता जाईल आणि त्यांची अंतिम मंजूरी झाल्यातच जमा आहे. आपल्या मिरा भाईदर शहराचा पाण्याचा अनेक वर्षापासूनचा प्रश्न होता तो ह्या आर्थिक वर्षात म्हणजे २०१५-१६ - २०१६-१७ साली पाण्यासाठी फिरावे लागणार नाही आणि २४ तास सर्वांना पाणी मिळेल अशी मी ह्याठिकाणी सर्वांना ग्वाही देतो. आपण जास्तीत जास्त दिड वर्षात किंवा १५ महिन्यांमध्ये ही स्किम पूर्ण करु मी हे सभागृहामध्ये सांगू इच्छितो. मा. सभापती महोदय आज प्रधान सचिव २ ह्यांच्याकडे आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेचे जे प्रलंबित प्रश्न आहेत त्याबद्दल २.०० वाजता बैठक बोलवली आहे. त्या अनुषंगाने मला त्या बैठकीला हजर राहणे गरजेचे आहे. मी उपायुक्त पानपट्टे ह्यांना प्राधिकृत करत आहे. त्यांनी सभा चालवावी मला जाण्याची परवानगी अवगत करावी. धन्यवाद.

**मा. सभापती :-**

आपल्या शहराच्या हिताचा विषय असल्यामुळे आपले जाणे खूप गरजेचे आहे. पानपट्टे साहेब आपण यावे. आणि आपण मांडलेल्या अंदाजपत्रकावर सोमवार पासून साधक-बाधक चर्चा करु. ११.०० वाजल्यापासून.

**नगरसचिव :-**

त्याचा मी कार्यक्रम देतो.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांना कळकळीचे आणि नम्रतेचे निवेदन आहे त्यांनी ११.०० वाजता यावे कारण बजेटचा विषय आहे.

(अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करण्यात आले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६५, दि. २९/१२/२०१४ प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. ११४ ने नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम यास मंजूरी दिली होती. सदरचा विषय फेरविचारार्थ सादर.

**मा. सभापती :-**

मी स्वतः सांगितले की हा विषय घ्या. कारण ह्या विषयावर शासनाकडून आपणास ग्रॅन्ड येते. आणि ग्रॅन्ड आल्यावर आपण हे काम करतो. प्रत्येक वर्षाला ही ग्रॅन्ड आपल्याकडे येत असते. ह्या विषयाला मंजूरी देऊन बराच वेळ झालेला आहे. त्याच्यानंतर ग्रॅन्ड यायची दुसरी टम आलेली आहे. ह्या विषयात काय प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. कारण ह्या सिस्टममध्ये प्रशिक्षणाचा एक भाग आहे. ज्यामुळे आम्हाला मुलांना प्रशिक्षण देता येऊ शकते. ते देखील आमचे प्रलंबीत आहे तर संबंधित विषयाची पूर्ण माहिती सादर करावी. कारण शहराच्या दृष्टीने खूप महत्वाचा विषय आहे. मा. सदस्य आपण सांगितल्याप्रमाणे ह्या विषयाची पूर्ण माहिती आणि कोणत्या स्टेजवर हे काम आहे त्यासाठी हा विषय इथे घेतलेला आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, डिझास्टर मॅनेजमेंट का स्टॅंडिंग सब्जेक्ट आया पहली बार हमारा आक्षेप था की यह रेट जादा है। दुसरी बार हमने उसको स्विकार किया पहले भी हमारा अज्ञानसा था डिझास्टर मॅनेजमेन्ट शासन ने पैसा स्विकृत किया है। उस पैसे का यहाँ पे कैसा यूज होगा उसकी जानकारी सदस्यों को नही दि गई। स्टॅंडिंग कमिटी वो संस्था है जो महानगरपालिका के बजेट को संतूलित करती है, उसको पास करती है। ग्रॅन्ड है उसका मतलब यह नहीं की उसको पास करना जरुरी है। जब तक अधिकारी लोग उसको अच्छी तरह समझा नही पाए की हम मिरा भाईदर महानगरपालिका में डिझास्टर मॅनेजमेंट लाऐंगे। ऐसे काम करेगा की इसमें प्रक्षेपण होगा। जब हम उसको समझ पाऐंगे तो उसको अच्छे से पास करके उसको सहाय्यता करेंगे। अगली बार आप पूरी माहिती दे उसमें यह पक्ष भी होना चाहिए की डिझास्टर मॅनेजमेंट ने कौन-कौन से असेसमेंट कहाँ पे

लगेंगे। कैसे कैसे लगेंगे क्या-क्या प्रशिक्षण दिया जाएगा। कैसे नेट वर्किंग की जाएगी की हमे लगे की डिझास्टर मॅनेजमेंट सक्सेसफूल हो जाएगा ना की यह खूद ही खरीद बने। हमने कहाँ था की रेट जादा है। अगर टेंडर में कम आये है और शासन इसको स्विकार करता है। मुझे कोई आपत्ती नही लेकिन जो भी चीज पर्चेस की जाए जिस को पर्चेस की जाए मेरा रिक्वेस्ट है की स्टँडिंग की सदस्य को उसकी एक कॉपी दे दी जाए। हम अपने लेवल पर चेकींग कर लेंगे। अगर वो बाजार भाव से जादा लिया गया है आपको वापिस देंगे की बाजार भावसे जादा लिया गया है। इसलिए अधिकारीयों से निवेदन है की जाँच कर ले की जब फस्ट टॉपिक आया था इसके रेट्स बहुत जादा है। और हमने बाकायदा लिख के दिया था कौन से रेट कैसे जादा है। कॉन्फ्रीगेशन और रेट्स में डिफरन्स होने पे अधिकारी जिम्मेदार रहेंगे।

**मा. सभापती :-**

डॉ. साहब, आपकी बात बहुत अच्छी लगी अभी बजेट हुआ है तो उसमें इलेक्ट्रॉनिक्स के रेट्स भी कुछ कम हूए है। संबंधीत अधिकारी से हम निवेदन करते है इस बारे में ध्यान रखना नेक्स्ट में प्रोव्हिजन करते समय या उसमें कोई बचत होती है तो और भी उसमें इम्प्रूमेन्ट कर सकते है।

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय आपण जे निविदामध्ये त्यांना जे रेट्स दिले आहेत ते साधारण २४०० लोकांना ते ट्रेनिंग देणार आहेत आणि पर परसेन्ट ७०० रुपये ट्रेनिंगचे लावले आहेत जे मी आधी ही सांगितले होते की खूप जास्त आहेत. कलेक्टर ऑफिसच्या ज्या डिझास्टर मॅनेजमेन्ट सिस्टम आहेत त्याच्याकडे खूप कमी आहेत. आणि ते तासाच्या दराने आहेत. जे आपल्याला स्वस्त पडते पंण सगळ्याच बाजूचा विचार करुन हे टेंडर पास करत आहेत तर स्टँडिंग कमिटीच्या मेंबर्सना आपण सविस्तर माहिती द्यावी की कुठल्या प्रकारची आणि काय ट्रेनिंग ह्या ७०० रुपयेत देणार आहेत. आणि ती आपल्याला किती उपयोगी आहे आणि कुठल्या गटाला कोणती ट्रेनिंग तुम्ही देणार आहात त्याची सविस्तर माहिती पाहिजे.

**मा. सभापती :-**

संपूर्ण माहितीसह सादर करावा.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय तुम्हाला एक विचारायचे आहे ते म्हणतात निविदा ७०० रुपयांनी मंजूर झाली. दर निश्चित झाला आहे ना. मग आता आपण दर कसा कमी करणार?

**मा. सभापती :-**

कमी करायचा विषय नाही. शासनाकडे कलेक्टर ऑफिस आहे, मुंबई महानगरपालिका आहे त्या ठिकाणी कोणत्या प्रकारच्या सुविधा पुरवतात आणि आपल्याकडे काय एक्स्ट्रा पूरवणार आहेत.

**सुहास रकवी :-**

कलेक्टर ऑफिसमध्ये दराची जी तफावत आहे ती तुम्ही कशी अॅडजस्ट करणार? त्यांची माहिती द्या. परत काय होणार निविदा मंजूर करायची नंतर त्याला बोलवून आधीच निगोशिएशन करुन जर इथे आणलात तर ते उत्तम राहील. डॉक्टर साहेबांनी सांगितले की जी तुम्ही मशीनरी घेणार त्याची कॉपी तुम्ही द्या.

**मा. सभापती :-**

त्याची काळजी घेण्यात यावी. दर आपण कमी करु शकत नाही त्याच्यामध्ये जे प्रशिक्षण देतात ते जास्त आपण देऊ शकतो. तेवढ्या दरात ते बघून घेऊ.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, आपने बोला कम नही कर सकते है लेकिन जो शासकीय दर है तो ज्यादा हमने क्यों अॅक्सेप्ट किया यह भी सवाल पडा है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो शासकीय दर नाही आपण निविदा काढली होती. निविदेमध्ये रेट आलेले आहेत. प्रत्येक प्रशिक्षणाचे दर वेगवेगळे असू शकतात.

**नयना वसाणी :-**

इसलिए बोला की क्या डिफरन्स है वह फाईंड आऊट करो।

**प्रभात पाटील :-**

दरात काही बदल होऊ शकत नाही. आपण २-३ महानगरपालिकेमध्ये डिझास्टर मॅनेजमेंटमध्ये काय दिले जाते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ती सविस्तर माहिती घेऊन आणतो.

**मा. सभापती :-**

संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची किंवा अधिकाऱ्यांची राहील. त्याची काळजी घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६६, वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता एक रुग्णवाहिका व एक मालवाहतुक वाहन खरेदी करणेबाबत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. टेंबा हॉस्पीटलला एक रुग्णवाहिका खरेदी करायची आहे. टेंबा हॉस्पीटल मार्च एन्डपर्यंत सुरु करायचे आहे. त्यासाठी रुग्णवाहिका आवश्यक आहे. आपण डायरेक्ट फोर्स कंपनी कडून ५२२ खाली शासकीय दराने आपण खरेदी करतो. तसेच एक माल वाहतूक टेम्पो ट्रॅव्हल खरेदी करायचे आहे. त्याचे सुध्दा शासकीय दर फिक्स केले आहेत त्याप्रमाणे खरेदी करणार.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, सबसे पहले जो रेट देखी मुझे आनंद हुआ की पहली बार लगा इतने कम किंमत में हम दो वाहन पर्चेस कर रहे है। लेकिन डायरेक्ट पर्चेस करने के पावर है। कंपनी सिलेक्ट किया यह किस रुल में आता है। मूरकुटे साहब बोलते है मोनोपॉली प्रॉक्यूमेन्ट उसी में आपने उसको लिया। यह मोनोपॉली प्रॉक्यूमेन्ट जो रुल है वह किस सन का कौनसे किताब से आपने निकाला है।

**भागवत मुरकूटे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो मॅन्यूअल पर्चेस ऑफ स्टोअर पर्चेस १९७८ शासनाचे नियम ................

**राजेंद्र जैन :-**

किस सदी के है।

**भागवत मूरकूटे :-**

१९७८.

**राजेंद्र जैन :-**

१९७८ की बूक है और यह किताब ७८ के बाद में इस बूक को स्विकार किया गया अस्विकार किया गया ऐसा कूछ है। ७८ की बूक आज भी स्विकार्य है या नहीं है।

**भागवत मूरकूटे :-**

आज स्विकार्य आहे आणि ती वित्तीय नियमाचे जे आहे ते त्याच पूस्तकावर आधारीत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्टॅंडिंग कमिटी के माध्यम से नगरविकास विभाग को सुझाव देना चाहता हूँ। ७८ के सजेशन का बूक का आजतक हम ॲडीशन करके की वो नया रुप क्या है वो रुल है वो सही है की नहीं है। कितने डी.एस.आर. रेट जूने चल रहे है। नगरविकास विभाग को एक कडा पत्र लिखा जाए की ७८ के हिसाब से २०१४ का प्रशासन चला रहे है। कमसे कम उसको रिव्ह्यू करके लेटेस्ट ॲडिशन दे तो मालूम पडे की सही क्या है गलत क्या है? यह आज बोलते है हमारे पास आदमी नही की सही है या गलत है। मुरकूटे साहब आपकी बात सही है लेकिन ७८ की बूक को कितना माने कितना ना माने हमारे पास प्रश्न खडा है।

**भागवत मूरकुटे :-**

७८ च्या ॲक्टमध्ये वारंवार अमेन्टमेंट झाले आहे. आणि ते वित्तीय विभागाशी रिलेटेड आहे.

**राजेंद्र जैन :-**

अमेन्टमेंट हुआ तो किस बूक में छपके आया अभी आप बताऐंगे। हमारा टेक्नीकल सवाल है। मा. सभापती महोदय स्टॅंडिंग कमिटीसे नगरविकास विभाग में सुझाव जाना चाहिए की आप महाराष्ट्र में क्या शासन चल रहे हो। ७८ के हिसाब से २०१४ चला रहे हो।

**मा. सभापती :-**

आपके जानकारी के लिए मैं बाताता हूँ ॲक्ट जब लागू होता है वही टाईम का पिरियड रहता है। खाली उसमें ॲमेटमेन्ट होती है। आज मिरा भाईंदर महानगरपालिका का अधिनियम १९४९ है अभी भी वही ॲक्ट है। डॉ. साहब आप हमारे बात को समझ नही रहे हो। डॉ. बाबासाहेब आंबेडकरने जो बनाया था वो उनको हिसाब से चल रहा है। उसमें अमेटमेन्ट होती रहती है। जब १९४९ बनाया था। १९७९ वही ॲक्ट है सिर्फ अमेटमेन्ट होती रहती है। उसमें चेंज नहीं होता।

**राजेंद्र जैन :-**

१९७८ का जब अमेटमेन्ट हुआ तो कहाँ पे आया १९८० पे आया होगा। वही तो में पूछता हूँ।

**मा. सभापती :-**

वही बूक में आएगा। ॲक्ट का बूक वही रहेगा।

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यावर एकच आहे की त्यांची जी सुचना असेल ती मान्य करुन ठराव मंजूर करा.

**राजेंद्र जैन :-**

मुरकुटे साहब की जो बूक है वह ताडपत्री जैसी हो गई है। उनका नया ॲडीशन मिलता नही हाथ लगाया तो फट जाती है। आप बोलते है यह ॲडीशन मेरे पास है कहाँ मिलती भी नहीं है। यह आपका जवाब रहता है। अगर नई बुक मिलती है तो हमको भी लाके दो हम भी पढेंगे।

**परशुराम म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये २०० खाटांचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करावयाचे आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात यापैकी ५० खाटा चालू करावयाच्या आहेत. त्यासाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता आहे.

तसेच पालिकेच्या वैद्यकीय विभागासाठी उपसंचालक - ठाणे, कुटुंब कल्याण विभाग - पुणे तसेच मुंबई येथून लसीकरणासाठी आवश्यक लस, निरोध, कॉपर -टी, जीवनसत्व अ, जंतनाशक औषधे, वेगवेगळया प्रकारच्या सिरिंजेस, लसवाहक बॉक्स, थर्माकॉल बॉक्स, आय.एल.आर, डीप फ्रिजर, कोल्ड बॉक्स, पोस्टर्स, बॅनर्स, विविध आरोग्य कार्यक्रमांचे रजिस्टर्स, मलेरिया साठी आवश्यक असणारी औषधे टी.बी व एम.डी.आर. टी.बी.साठीची औषधे, इ. आणावी लागतात. सदर कामी मालवाहतूक वाहन उपलब्ध नसल्याने रुग्णांकरिता वापरण्यात येणारी रुग्णवाहिका वापरावी लागते. परिणामी रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने रुग्णांची गैरसोय होते व रुग्णांचे नातेवाईक नाराजी व्यक्त करतात.

तरी वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता रुग्णांसाठी एक रुग्णवाहिका व लस, औषधे, साहित्य, इ. ने - आण करणेकरिता स्वतंत्र मालवाहतूक वाहनाची आवश्यकता आहे. बाजारात टाटा व फोर्स कंपनीच्या गाडया रुग्णवाहिका म्हणून वापरण्यासाठी उपलब्ध आहेत. मात्र टाटा कंपनीची विंगर ही गाडी छोटी असल्यामुळे फोर्स कंपनीची ट्रॅव्हलर डिलीवरी व्हॅन ३३५० ही गाडी रुग्णवाहिका व मालवाहतूक वाहन म्हणून विकत घेण्यासाठी शासकीय दरानुसार दर मागविले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Description | Unit Value Rs. | Qty | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| **Traveller Delivery van with power steering, 3350 MM WB, under spl govt price** | 577,866.00 | 2 | 11,55,732.00 |
| Basic Excise Duty @ 8% | 46,229.28 | 2 | 92,458.56 |
| Cess @ 0.125% | 722.33 | 2 | 1,444.66 |
| Education Cess @ 2% on BED | 924.59 | 2 | 1,849.18 |
| Higher Secondary Education Cess @ 1% on BED | 462.29 | 2 | 924.58 |
| **Sub Total** | **626,204.49** | **2** | **12,52,408.98** |
| CST @ 13% | 81,406.58 | 2 | 1,62,813.16 |
| **Sub Total Ex- Pithampur (Ex-Factory)** | **707,611.07** | **2** | **15,222.14** |
| Transportation & Transit Insurance charges from Pithampur to our Dealer Destination. Zone-2 | 12653 | 2 | 25306 |
| **Total Vehicle Cost** | **720,264.07** | **2** | **14,40,528.14** |

परंतु केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार Excise Duty ८ % वरुन १२ % वाढल्यामुळे सदर वाहन खरेदीबाबत फोर्स कंपनीकडून नवीन दर प्राप्त झाले असून ते खालीलप्रमाणे आहेत.

| Description | Unit Value Rs. | Qty | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| **Traveller Delivery van with power steering, 3350 MM WB, under spl govt price** | 577,866.00 | **2** | 11,55,732.00 |
| Basic Excise Duty @ 12% | 69,343.92 | 2 | 1,38,687.84 |
| Cess @ 0.125% | 722.33 | 2 | 1,444.66 |
| Education Cess @ 2% on BED | 1,386.88 | 2 | 2,773.76 |
| Higher Secondary Education Cess @ 1% on BED | 693.44 | 2 | 1,386.88 |
| **Sub Total** | **650,012.57** | **2** | **13,00,025.14** |
| CST @ 13% | 84,501.63 | 2 | 1,69,003.26 |
| **Sub Total Ex- Pithampur (Ex-Factory)** | **734,514.20** | **2** | **14,69,028.4** |

| | | | |
|---|---|---|---|
| Transportation & Transit Insurance charges from Pithampur to our Dealer Destination. Zone-2 | 12653.00 | 2 | 25,306 |
| **Total Vehicle Cost** | **747,167.20** | **2** | **14,94,334.4** |
| Departmental Charges 0.25 % as per RC Terms pt 24.d | 1,867.92 | 2 | 3,735.84 |
| Service Tax 12.36 % on departmental Charges | 230.87 | 2 | 461.74 |
| **Grand Total Payable on DGS&D rate** | **749,266.00** | **2** | **14,98,532.00** |

वरीलप्रमाणे फोर्स कंपनीच्या दोन वाहनांची एकूण किंमत रु. १४,९८,५३२/- इतकी होते. शासनाने करांत वाढ केल्यामुळे वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्यास सदर वाढीव दराने वाहने खरेदी करणे आवश्यक राहील. सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात "नविन आयसीयु/रुग्णवाहिका खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु. २०,००,०००/- लाखाची तरतूद शिल्लक आहे. सदर तरतुदीतुन फोर्स कंपनीची रुग्णवाहिका व मालवाहतूक वाहन खरेदी करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये एक रुग्णवाहिका व एक मालवाहतूक वाहन खरेदी करण्यास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**नरेश पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १६६ :-**

वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता एक रुग्णवाहिका व एक मालवाहतुक वाहन खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. १५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये २०० खाटांचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करावयाचे आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात यापैकी ५० खाटा चालू करावयाच्या आहेत. त्यासाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता आहे.

तसेच पालिकेच्या वैद्यकीय विभागासाठी उपसंचालक - ठाणे, कुटुंब कल्याण विभाग - पुणे तसेच मुंबई येथून लसीकरणासाठी आवश्यक लस, निरोध, कॉपर -टी, जीवनसत्व अ, जंतनाशक औषधे, वेगवेगळया प्रकारच्या सिरिंजेस, लसवाहक बॉक्स, थर्माकॉल बॉक्स, आय.एल.आर, डीप फ्रिजर, कोल्ड बॉक्स, पोस्टर्स, बॅनर्स, विविध आरोग्य कार्यक्रमांचे रजिस्टर्स, मलेरिया साठी आवश्यक असणारी औषधे टी.बी व एम.डी.आर. टी.बी.साठीची औषधे, इ. आणावी लागतात. सदर कामी मालवाहतूक वाहन उपलब्ध नसल्याने रुग्णांकरिता वापरण्यात येणारी रुग्णवाहिका वापरावी लागते. परिणामी रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने रुग्णांची गैरसोय होते व रुग्णांचे नातेवाईक नाराजी व्यक्त करतात.

तरी वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता रुग्णांसाठी एक रुग्णवाहिका व लस, औषधे, साहित्य, इ. ने - आण करणेकरिता स्वतंत्र मालवाहतूक वाहनाची आवश्यकता आहे. बाजारात टाटा व फोर्स कंपनीच्या गाडया रुग्णवाहिका म्हणून वापरण्यासाठी उपलब्ध आहेत. मात्र टाटा कंपनीची विंगर ही गाडी छोटी असल्यामुळे फोर्स कंपनीची ट्रॅव्हलर डिलीवरी व्हॅन ३३५० ही गाडी रुग्णवाहिका व मालवाहतूक वाहन म्हणून विकत घेण्यासाठी शासकीय दरानुसार दर मागविले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Description | Unit Value Rs. | Qty | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| **Traveller Delivery van with power steering, 3350 MM WB, under spl govt price** | 577,866.00 | 2 | 11,55,732.00 |
| Basic Excise Duty @ 8% | 46,229.28 | 2 | 92,458.56 |
| Cess @ 0.125% | 722.33 | 2 | 1,444.66 |
| Education Cess @ 2% on BED | 924.59 | 2 | 1,849.18 |
| Higher Secondary Education Cess @ 1% on BED | 462.29 | 2 | 924.58 |
| **Sub Total** | **626,204.49** | **2** | **12,52,408.98** |
| CST @ 13% | 81,406.58 | 2 | 1,62,813.16 |

| | | | |
|---|---|---|---|
| **Sub Total Ex- Pithampur (Ex-Factory)** | **707,611.07** | **2** | **15,222.14** |
| Transportation & Transit Insurance charges from Pithampur to our Dealer Destination. Zone-2 | 12653 | 2 | 25306 |
| **Total Vehicle Cost** | **720,264.07** | **2** | **14,40,528.14** |

परंतु केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार Excise Duty ८ % वरुन १२ % वाढल्यामुळे सदर वाहन खरेदीबाबत फोर्स कंपनीकडून नवीन दर प्राप्त झाले असून ते खालीलप्रमाणे आहेत.

| Description | Unit Value Rs. | Qty | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| **Traveller Delivery van with power steering, 3350 MM WB, under spl govt price** | 577,866.00 | **2** | 11,55,732.00 |
| Basic Excise Duty @ 12% | 69,343.92 | 2 | 1,38,687.84 |
| Cess @ 0.125% | 722.33 | 2 | 1,444.66 |
| Education Cess @ 2% on BED | 1,386.88 | 2 | 2,773.76 |
| Higher Secondary Education Cess @ 1% on BED | 693.44 | 2 | 1,386.88 |
| **Sub Total** | **650,012.57** | **2** | **13,00,025.14** |
| CST @ 13% | 84,501.63 | 2 | 1,69,003.26 |
| **Sub Total Ex- Pithampur (Ex-Factory)** | **734,514.20** | **2** | **14,69,028.4** |
| Transportation & Transit Insurance charges from Pithampur to our Dealer Destination. Zone-2 | 12653.00 | 2 | 25,306 |
| **Total Vehicle Cost** | **747,167.20** | **2** | **14,94,334.4** |
| Departmental Charges 0.25 % as per RC Terms pt 24.d | 1,867.92 | 2 | 3,735.84 |
| Service Tax 12.36 % on departmental Charges | 230.87 | 2 | 461.74 |
| **Grand Total Payable on DGS&D rate** | **749,266.00** | **2** | **14,98,532.00** |

वरीलप्रमाणे फोर्स कंपनीच्या दोन वाहनांची एकूण किंमत रु. १४,९८,५३२/- इतकी होते. शासनाने करांत वाढ केल्यामुळे वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्यास सदर वाढीव दराने वाहने खरेदी करणे आवश्यक राहील. सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात "नविन आयसीयु/रुग्णवाहिका खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु. २०,००,०००/- लाखाची तरतूद शिल्लक आहे. सदर तरतुदीतुन फोर्स कंपनीची रुग्णवाहिका व मालवाहतूक वाहन खरेदी करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये एक रुग्णवाहिका व एक मालवाहतूक वाहन खरेदी करण्यास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. परशुराम म्हात्रे** **अनुमोदन :- श्री. नरेश पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६७, महिला व बालकल्याण समिती सभेकरीता लागणाऱ्या चहा, नाष्टा, पाणी, जेवण ई. खर्चाच्या देयकास मंजूरी मिळणेबाबत.

**मंदाकिणी गावंड :-**

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत असलेल्या महिला व बालकल्याण समिती सभा ही प्रत्येक महिन्याला भरविण्यांत येत असते. मा. महासभेत, मा. स्थायी समिती सभेत मा. सदस्यांना, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना चहा, नाश्ता, जेवण, पाणी इ. ची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेत येत असते. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समिती सभेसाठी चहा, नाश्ता, जेवण व पाणी पुरविणे यासाठी माहिला व बालकल्याण योजने अंतर्गत स्वतंत्र लेखाशिर्षक करुन सदरचा खर्च करण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**प्रभात पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय वृक्ष प्राधिकरणची पण मिटींग लागत असते. त्याच्यासाठी देखील आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ह्या लेखाशिर्षासाठी द्यावी अशी माझी सुचना आहे.

**प्रभात पाटील :-**

माझे अनुमोदन आहे. पण मला एक गोष्ट बोलायची आहे की हे महिला बालकल्याणचे विषय आहेत ना चहा नाष्ट्याचे विषय स्टँडिंगला येणार आणि महिला बालकल्याण समिती एखाद्या महिलाच्या बाबतीत, अंध-अपंगाच्या बाबतीत किंवा महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत तिथे निर्णय करत असते पण मंजूरीसाठी महासभेत यायला लागते. तिथे सगळ्या पक्षाचा ताळमेळ नसल्यामुळे ते ठराव तिकडे बारगळले जातात. महिला बालकल्याण स्वतंत्र विषय देण्याचा अधिकार घेऊन या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॅडम महासभेत विषय झाला नाही ना. इतर महानगरपालिकेमध्ये अधिकार दिले आहेत.

**प्रभात पाटील :-**

प्रत्येक वेळेला महिला बालकल्याण महासभेकडे आ लावून बसायचे. हे कितपत योग्य आहे. तुम्ही तो विषय पूढे द्या ना. माझी सुचना घ्या. तुम्ही महासभेत विषय घ्या की महिला बालकल्याण समितीला तिचे अधिकार देऊन टाका.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय प्रस्ताव है मंजूरी देने का भी है। लेकिन किसकी मंजूरी वो तो स्पष्ट नहीं है। स्टँडिंग कमिटी इज द फायनलाइज्ड हायेस्ट फायनन्शीयल बॉडी ऑफ महानगरपालिका. आपने आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिया उसके बाद कितना दिया क्लियर नहीं किया। तो स्टँडिंग कमिटी में पास क्या किया।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपल्या माहितीसाठी सांगतो तिथे पण १५ सदस्य आहेत. इथे पण १५ सदस्य आहेत. जेवढा आपल्याला खर्च होणार तेवढाच तिथे खर्च होणार आहे. त्या मिटींगमध्ये आयुक्त प्राधिकृत आहेत. सगळे अधिकारी नसतातच. त्या विभागाचे अधिकारी असतात. त्यामुळे तिकडे आपल्यापेक्षा पण कमी खर्च होईल. ही माझी अपेक्षा आहे.

**प्रभात पाटील :-**

त्यांचे बजेट किती छोटे आहे. ३.८० ची तरतूद आहे. तेवढ्यातच ते करणार आहेत. त्याच्या पलीकडे काय जाणार आहेत ते. उलट मी तर म्हणेन महिला बालकल्याणला रक्कम वाढवून द्या.

**मा. सभापती :-**

आपण नक्की प्रयत्न करु. आपण महासभेला विषय सादर करण्यासाठी प्रशासनाला तो विषय महासभेपूढे सादर करायला सांगतो. विषय सुचनेसह सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १६७ :-**

महिला व बालकल्याण समिती सभेकरीता लागणाऱ्या चहा, नाष्टा, पाणी, जेवण ई. खर्चाच्या देयकास मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १५६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत असलेल्या महिला व बालकल्याण समिती सभा ही प्रत्येक महिन्याला भरविण्यांत येत असते. मा. महासभेत, मा. स्थायी समिती सभेत मा. सदस्यांना, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना चहा, नाश्ता, जेवण, पाणी इ. ची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेत येत असते. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समिती सभेसाठी चहा, नाश्ता, जेवण व पाणी पुरविणे यासाठी माहिला व बालकल्याण योजने अंतर्गत स्वतंत्र लेखाशिर्षक करुन सदरचा खर्च करण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. मंदाकिनी गावंड अनुमोदन :- सौ. प्रभात पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

वृक्ष प्राधिकरण समिती ह्यांनाही वरील प्रमाणे मंजूरी द्यावी अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

महिला व बालकल्याण समितीस त्यांचे स्वतःचे ठराव करुन ते मान्य करण्याचे वा पारित करण्याचे अधिकार त्यांचेकडे देण्यासाठी म्हणजे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व राखण्यासाठी त्यांना अधिकार देण्यासाठी संबंधित विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

सही/-
सभापती
स्थायी समिती
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६८, कर्मचाऱ्यांचे वैद्यकिय ग्रुप विमा योजनेकरीतां प्राप्त दरपत्रकापैकी दि न्यु इंडिया ॲशोरन्स कंपनी लि. यांचे कमी दराचे दरपत्रक मंजूर करणेबाबत.

**नयना वसाणी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत १५५६ स्थायी अधिकारी व कर्मचारी यांना (कुटुंब सदस्य संख्या १ अ ३) रक्कम रू. २,००,०००/- ची १० वर्षाच्या कालावधीकरिता, वैद्यकीय ग्रुप विमा योजना लागू करण्याकरिता शासनाच्या उपक्रम असलेल्या विमा कंपन्या यांच्याकडून दरपत्रके मागविणेचे प्रस्तावित होते. याप्रमाणे शासनमान्य कंपन्या यांच्याकडून दि. ०७/०२/२०१५ दुपारी २.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यात दर पत्रके मागविण्यात आलेली होती. या अनुषंगाने विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) युनायटेड इंडिया इन्शूरन्स कंपनी लि., नेहरू पॅलेस, नवी दिल्ली – ११००१९ यांची ओपीडी सुविधा वगळून रू. १,०५,५९,०१९/- व ओपीडी सुविधेसह रू. १,४३,९३,४१६/- सर्व करासहित वार्षिक हप्ता रक्कम असलेले दरपत्रक २) दि न्यु इंडिया ॲशोरन्स कंपनी लि., सांताक्रुझ (प.) शाखा यांची रू. ८५,००,०००/- सर्व करासहित वार्षिक हप्ता रक्कम असलेले दरपत्रक ३) दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लि. बँक स्ट्रीट, मुंबई – ४०००२३ यांची रू. ८९,८८,०००/- सर्व करासहित वार्षिक हप्ता रक्कम असलेले दरपत्रक. सदरचे दरपत्रकांतील विहीत नमुन्यातील विस्तृत अटीशर्तीचा तपशिल असलेला तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

सदरचे तुलनात्मक तक्त्याचे आवलोकन केले असता मिरा भाईंदर महानगरपालिकेने नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार दि न्यु इंडिया ॲशोरन्स कंपनी लि., मंडळ कार्यालय १४२०००, जीवन सेवा बिल्डींग, २ रा मजला, एस. व्ही. मार्ग, सांताक्रुझ (प.), मुंबई – ४०००५४ यांची रू. ८५,००,०००/- वार्षिक विमा हप्ता (सर्व करांसहित) असलेले दरपत्रक तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे व महानगरपालिकेने विहीत केलेल्या अटीशर्ती प्रमाणे आहेत.

प्रस्तुत निविदा प्रिमियम सर्व दर व करासहित असल्याने सदर करार कालावधीमध्ये विदयमान करामध्ये शासनाने काही कर वाढ केल्यास व त्यामुळे विमा कंपनीने रू. ८५ लक्ष या मुळ किंमतीत नुतनीकरणास मान्यता न दिल्यास, त्या वर्षी करार रद्द करून नव्याने प्रिमियमचे दर प्रशासनाने मागवावेत.

तरी वरीलप्रमाणे दि न्यु इंडिया ॲशोरन्स कंपनी लि. यांचे दरपत्रक स्विकारणेस व १५५६ स्थायी कर्मचाऱ्यांचेसाठी वार्षिक रू. ८५ लक्ष (सर्व दर करासहित) प्रिमियम कंपनीस प्रदान करून दि. ०१/०३/२०१५ ते २८/०२/२०२५ या दहा वर्ष कालावधीकरिता करार करणेस सदरची सभा मंजूरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय मागच्या वेळेला मंजूर केला होता. आपण सांगितलेले त्यांचे दरपत्रक मागवून घ्या आणि त्याच स्तरावर त्यांना मंजूरी द्यायला सांगितलेली कमी दराने येईल त्यांना ते द्यायला सांगितले. तरी हा विषय पून्हा आला आहे. पॉलिसी वाल्यांना चेक दिले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मंजूरी मिळाल्यानंतर देणार ना.

**मा. सभापती :-**

साहेब, हा विषय लोकांच्या हिताचा कमचाऱ्यांच्या हिताचा आहे. आपण जेव्हा अनुदान देतो तो आगाऊ देतो त्याची मंजूरी घेत नाही. कारण तो सर्व कर्मचाऱ्यांच्या हिताचा असतो. म्हणून देतो त्याला कोणी विरोध करत नाही. हा विषय एवढा महत्वाचा असताना ह्याचा चेक का नाही देण्यात आला. मंजूरी तेव्हाच दिली होती. तेव्हा आपण सांगितलेले ८९ लाख होते. त्याच्यापेक्षा कमी आले तर ताबडतोब देण्यात यावे. आज ते ८५ लाखाची आली असताना त्या माणसाला प्रिमियमचा चेक का नाही देण्यात आला. ह्याचा अर्थ प्रशासन कुठेतरी हलगर्जीपणा करते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, आज दरपत्र मंजूर होईल निविदेच्या अगोदर स्टँडिंग कमिटीला आहे. आजच्या आज मंजूर झाल्यावर संध्याकाळ पर्यंत ........................

**मा. सभापती :-**

आम्ही अगोदर सांगितलेले कमी दराने येईल त्याला देण्यात यावे. माझा रोष त्यांच्याबाबत नाही. तुम्ही आता बोलता स्टँडिंगमध्ये दर मंजूर झाल्यावर देणार तेव्हा का नाही अनुदानाच्या वेळेला बोलतात की स्टँडिंगमध्ये मंजूर झाल्यावर देणार.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

आपण तेव्हा मंजूरी दिली आहे.

**सुहास रकवी :-**

ती मौखिक झाली लेखी हवी आहे.

**मा. सभापती :-**

आम्ही जे इथे बोलते ते लेखी पण येते. काय होते कर्मचारी आपल्याला विचारतात प्रश्नांची उत्तर देताना खूप कठीण जाते. म्हणून तुम्हाला सांगण्यात आले.

**राजेंद्र जैन :-**

इसमें एक टेक्नीकल प्रॉब्लेम ऐसा है। हमने एक कदम उठाया की हमे यह दर जादा लगता है और हम दर कम करना चाहते है। हम चाहते है कम आए। उस समय अधिकारीयोने बताया की अगर इससे जादा दर आयी फलाना फलाना काम के अंदर चार साल की जेल हो सकती है। हमारा सिधासाधा मंत्र क्या था की हम चाहते है की हमे जादा लग रहा है। हमारे पास इसकी नॉलेज है। हमारे पास कोई टेक्नीकल ब्युरो कट्स दिए है की नही है। हम अपने रस्ते से जानकारी निकालते है। किस चीज में गलती है या जादा दर निकाली गई है। तो हम उसे कम करना चाहते है। यह हमारा हित है वो नगरपालिका में हित में है। लेकिन कानून ऐसे बनाए गए है की आप चाहकर भी उसमें रिस्क लेनी पडती है की अगर जादा आया तो आपके जो दर जादा लगेगा में फिर आपके माध्यम से नगर विकास विभाग को यह सुचना देना चाहता हूँ। और यह पत्र जाना चाहिए की आपके इस कानून से हमपर बंधन आता है। हमारे नगरपालिका का महानगरपालिका और जनता का जो हित करना चाहते है वो करने से बाधा पडती है। ऐसा गलत कदम जहाँ यह स्पष्ट हो की यह जानकर किसीको नही किया गया। जहाँ हमे लगता है बाद में जादा भी आता है। तो उसके उपर कानून का डर दिखा कर दबाया जाता है। यह नहीं होना चाहिए।

**मा. सभापती :-**

बरोबर आहे. मागच्या वेळेस अधिकाऱ्यांना सांगितले दर जास्त आला तर तुम्हाला शिक्षा होऊ शकते किंवा सस्पेंड होऊ शकतो. अशाप्रकारचे ते विषय होते. तेव्हाच आपण सांगितले आणि हे बसून केले आणि हा दर कमी आला. ८९ लाखावरुन आता ८५ लाख म्हणजे ४ लाखाचा फरक आहे. ह्या सारख्या प्रक्रिया म्हणून आपण फेरनिविदा मागवतात त्याचे हेच कारण असते. जर कमी दर आला तर तोच पैसा भविष्यात आम्हाला कुठे ना कुठे शहराच्या विकासासाठी वापरण्यात येईल. ह्याच्यावर आपण गांर्भियाने लक्ष द्यावे. आजच्या आत चेक देण्याची व्यवस्था करावी. ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १६८ :-**

कर्मचाऱ्यांचे वैद्यकिय ग्रुप विमा योजनेकरीता प्राप्त दरपत्रकापैकी दि न्यु इंडिया ॲशोरन्स कंपनी लि. यांचे कमी दराचे दरपत्रक मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. १५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत १५५६ स्थायी अधिकारी व कर्मचारी यांना (कुटुंब सदस्य संख्या १ अ ३) रक्कम रू. २,००,०००/- ची १० वर्षाच्या कालावधीकरिता, वैद्यकीय ग्रुप विमा योजना लागू करण्याकरिता शासनाच्या उपक्रम असलेल्या विमा कंपन्या यांच्याकडून दरपत्रके मागविणेचे प्रस्तावित होते. याप्रमाणे शासनमान्य कंपन्या यांच्याकडून दि. ०७/०२/२०१५ दुपारी २.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यात दर पत्रके मागविण्यात आलेली होती. या अनुषंगाने विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

